औद्योगिक संस्था, अशासकीय संस्था आणि वनविभाग यांच्यामार्फत त्रिपक्षीय करारनामा करुन अवनत वनक्षेत्राचे पुनर्वनीकरण करण्याबाबत.

औद्योगिक संस्था - क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लि., एम.आय.डी.सी. कुरकुंभ, ता. दौंड, जि. पुणे.
अशासकीय संस्था- आई सेवाभावी संस्था, दौंड, ता. दौंड, जि. पुणे आणि उप वनसंरक्षक, पुणे.

महाराष्ट्र शासन
वन विभाग
शासन आदेश क्रमांकः एफएलडी-१९२६/प्र.क्र.२१४/फ-१०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १७ /०८/२०२६.

प्रस्तावना -

अवनत वन क्षेत्राचे पुनर्वनीकरण करण्यासाठी खाजगी व अशासकीय संस्थांचा सहभाग घेण्याबाबत त्रिपक्षीय करारनामा करुन वनीकरण हाती घेण्याच्या धोरणास शासनाने शासन निर्णय क्र. एफएलडी-२०११/प्र.क्र.१६७/फ-१०, दिनांक ०५/०६/२०२३ अन्वये मान्यता दिली आहे. तसेच शासन निर्णय क्र.एफएलडी-२०११/प्र.क्र.१६७/फ-१०, दिनांक १८/०२/२०२५ अन्वये सदर शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. सदर प्रकरणी निर्णय घेण्याकरीता शा.नि दि.१८/०२/२०२५ अन्वये गठीत उच्चाधिकार समितीपुढे क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लि., एम.आय.डी.सी. कुरकुंभ, ता.दौंड, जि.पुणे या औद्योगिक संस्थेचा व आई सेवाभावी संस्था, ता.दौंड, जि.पुणे ही अशासकीय संस्था व उप वनसंरक्षक पुणे यांच्यासमवेत त्रिपक्षीय करारनामा करुन मौजे गिरीम, ता.दौंड, जि.पुणे येथील १९.०० हे. लागवडयोग्य अवनत वनक्षेत्रावर २१,१०९ रोपांची लागवड करण्याचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी तथा सदस्य सचिव, उच्चाधिकार समिती यांनी पत्र क्र.कक्ष-१७/नोसेल/१७-४/ प्र.क्र.२०७/७७९/२०२६-२७ नागपूर, दिनांक ०३/०७/२०२६ अन्वये सादर केला होता. सदर प्रस्तावास उच्चाधिकार समितीने दिनांक ०६.०८.२०२६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेस अनुलक्षून शासन पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

शासन आदेश -

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी तथा सदस्य सचिव, उच्चाधिकार समिती यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचा साकल्याने विचार करुन, उच्चाधिकार समितीने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे. क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लि., एम.आय.डी.सी. कुरकुंभ, ता.दौंड, जि.पुणे या औद्योगिक संस्थेच्या प्रस्तावास अनुसरुन अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिनांक ०३.०७.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार खाली नमूद केलेल्या ठिकाणी क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लि., एम.आय.डी.सी. कुरकुंभ, ता.दौंड, जि.पुणे ही औद्योगिक संस्था, आई सेवाभावी संस्था, दौंड, ता.दौंड, जि.पुणे ही अशासकीय संस्था व उप वनसंरक्षक, पुणे यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करुन एकूण १९.०० हेक्टर अवनत वनक्षेत्रावर वृक्ष लागवड करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे. वृक्ष लागवडीसाठी प्रस्तावित वनजमिनीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	औद्योगिक संस्थेचे नाव	अशासकीय संस्थेचे नाव	गावाचे गाव	कक्ष क्र.	गट क्र.	प्रस्तावीत लागवड योग्य क्षेत्र (हे.)	वैधानिक दर्जा	लागवडीसाठी प्रस्तावीत रोपे
१.	क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लि., एम.आय.डी.सी. कुरकुंभ, ता.दौंड, जि.पुणे	आई सेवाभावी संस्था, दौंड, ता.दौंड, जि.पुणे	मौजे गिरीम, ता.दौंड, जि.पुणे	५६१ अ	७२०	१९.००	राखीव वन	२१,१०९

२. सदर प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे:-

i. वनीकरणासाठी प्रस्तावीत करण्यात आलेल्या अवनत वनजमिनीपासून औद्योगिक संस्था क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लि.,एम.आय.डी.सी. कुरकुंभ, ता.दौंड, जि.पुणे यांच्या मालकीचे क्षेत्र ३५४ मीटर अंतरावर स्थित आहे. सदर बाबीस उच्चाधिकार समितीमार्फत शिथीलता देऊन विशेष बाब म्हणून सदर प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ii. प्रकल्पांतर्गत कार्यवाही करताना प्रकल्प यंत्रणा यांना प्रस्तावीत वनीकरण क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम किंवा वनतळे तयार करता येणार नाही.

iii. औद्योगिक संस्था व अशासकीय संस्था यांनी मागील ३ वर्षाचे सनदी लेखापाल (Chartered Accountant) यांच्यामार्फत प्रमाणित केलेले ताळेबंद उपवनसंरक्षक, पुणे यांच्याकडे सादर करावेत.

iv. वृक्ष लागवडीसाठी आंबा, जांभूळ, रुद्राक्ष, सुरंगी, बकूळी, मोह, सिंधी इ. वृक्षांच्या प्रजातीची प्राधान्याने लागवड करावी.

v. अशासकीय संस्था वनीकरणासाठी प्रस्तावीत करण्यात आलेल्या स्थळापासून औद्योगिक संस्था, अशासकीय संस्था यांचे अंतर दर्शविण्यात येणारी KML फाईल वनीकरणापूर्वी उप वनसंरक्षक यांना सादर करावी.

vi. औद्योगिक संस्था- क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लि., एम.आय.डी.सी. कुरकुंभ, ता. दौंड, जि. पुणे आणि अशासकीय संस्था- आई सेवाभावी संस्था, दौंड, ता. दौंड, जि. पुणे यांनी वनीकरण क्षेत्रात योग्य आकाराचे दर्शनीय फलक बसवून त्यावर ही मालमत्ता वन विभागाची असल्याचे व कंपनी/ बँकींग संस्था /अशासकीय संस्था यांना फक्त वनीकरण करण्यास तात्पुरती परवानगी देण्यात आली असल्याबाबतचे हमीपत्र उपवनसरंक्षक यांना वनीकरणापूर्वी सादर करतील, तदनंतरच सदरचे वनक्षेत्र वृक्ष लागवडीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावे.

vii. वन विभाग व सदरहू संस्था यांमध्ये १५ दिवसांत याबाबतचा करारनामा करण्यात यावा.

viii. वृक्ष लागवडीसाठी प्रस्तावीत करण्यात आलेल्या १९.०० हे. क्षेत्राचे सिमांकन हे वृक्ष लागवडीपूर्वी करण्यात यावे.

ix. उपवनसरंक्षक, पुणे यांनी सदर करारनामा करण्यापूर्वी राज्य शासनाच्या दि.०५.०६.२०२३ व दि.१८.०२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयामधील सर्व अटींची पूर्तता होत असल्याची पुन:श्च खात्री करावी.

x. वरील अवनत वनक्षेत्रात वृक्ष लागवड करणे, मृदसंधारण करणे, तसेच वृक्षांची योग्य वाढ व व्यवस्थापनाच्या दृष्ठीने ७ वर्षापर्यंत त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याचे काम, **आई सेवाभावी संस्था, दौंड, ता.दौंड, जि.पुणे** या अशासकीय संस्थेने करावे.

xi. उक्त प्रयोजनासाठी व त्याच्या व्यवस्थापनासाठी येणारा खर्च **क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लि., एम.आय.डी.सी. कुरकुंभ, ता.दौंड, जि.पुणे** ही औद्योगिक संस्था करेल.

xii. प्रकल्पांतर्गत करण्यात येणारी वृक्ष लागवड ही वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या पर्यवेक्षणाखाली करण्यात यावी. करारनाम्यानंतर २ वर्षांच्या आत वृक्ष लागवड पूर्ण करण्यात यावी.

xiii. प्रकल्पासाठी शासनपत्र क्र.एफएलडी-१०१२/प्र.क्र.२०३/फ-१०, दि.०८/०१/२०१३ अन्वये विहित केलेल्या त्रिपक्षीय करारनाम्याच्या मसुद्याप्रमाणे क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लि., एम.आय.डी.सी. कुरकुंभ, ता.दौंड, जि.पुणे यांच्या अर्थसहाय्याने आई सेवाभावी संस्था, दौंड, ता.दौंड, जि.पुणे यांच्यामध्ये त्रिपक्षीय करारनामा करण्यात यावा. वन विभागाच्या वतीने त्रिपक्षीय करारनाम्यावर स्वाक्षरी करण्यासाठी उपवनसंरक्षक, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

xiv. त्रिपक्षीय कराराअंतर्गत रोपवन कामे करताना प्रकल्प यंत्रणा यांनी जिवंत रोपांची टक्केवारी वाढविण्यासाठी सर्वोतपरी प्रयत्न करावे.

xv. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले वन विभागाचे कोणतेही अधिकारी यांना प्रकल्प स्थळी भेट देवून प्रकल्पाचे निरीक्षण करण्याचा व त्याबाबत सुधारणा / सूचना करण्याचा अधिकार राहील.

xvi. त्रिपक्षीय करारनाम्यातील कोणत्याही अटींचा औद्योगिक संस्था व अशासकीय संस्था यांच्याकडून भंग झाल्यास त्रिपक्षीय करारनामा तात्काळ समाप्त करण्याचा अथवा संबंधित संस्था यांच्याविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्याचा अथवा आवश्यक कारवाई करण्याचा अधिकार प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना असेल.

xvii. ज्या ठिकाणी आवश्यकता असेल त्या ठिकाणी औद्योगिक संस्थेच्या खर्चाव्दारे रोपवनास तारेचे कुंपण (Wire Fencing) करण्यात यावे.

xviii. आवश्यकतेनुसार रोपवनास सिंचनाची व्यवस्था करण्यात यावी. सदर सिंचनाची व्यवस्था करताना वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग होणार नाही, याची दक्षता संबंधित संस्था आणि उपवनसंरक्षक यांनी घ्यावी.

xix. औद्योगिक संस्था आणि अशासकीय संस्था यांना शासन निर्णय क्रमांक एफएलडी-२०११ /प्र.क्र.१६७/फ-१०, दिनांक ०५/०६/२०२३ व दिनांक १८/०२/२०२५ मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

xx. त्रिपक्षीय कराराअंतर्गत रोपवन कामे करताना वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८० व इतर वनकायद्यांचा भंग होणार नाही याची दक्षता संबंधित संस्था आणि उपवनसंरक्षक यांनी घ्यावी.

xxi. त्रिपक्षीय कराराचा कालावधी संपुष्ठात आल्यानंतर संबंधित संस्थेने सदरचे वनक्षेत्र वनविभागाकडे सूपूर्द करावेत. तसेच सदर वनक्षेत्रावरील वृक्ष आणि इतर तत्सम घटकांवर संस्थेचा कोणताही अधिकार राहणार नाही. सदरचे वनक्षेत्र वनविभागाच्या ताब्यात घेण्याची जबाबदारी संबंधित उपवनसंरक्षक यांची राहील.

३. वरील ठिकाणी वृक्ष लागवड करुन त्याची पुढील ७ वर्ष देखभाल करण्याची जबाबदारी औद्योगिक व अशासकीय संस्थेची राहील. तसेच वृक्ष लागवडीनंतर भविष्यात कधीही या वनक्षेत्रावर क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लि., एम.आय.डी.सी. कुरकुंभ, ता.दौंड, जि.पुणे ही औद्योगिक संस्था, आई सेवाभावी संस्था, दौंड, ता.दौंड, जि.पुणे ही अशासकीय संस्था यांना कोणताही कायदेशीर व मालकी हक्क प्राप्त होणार नाही आणि त्याबद्दल त्यांना कोणत्याही न्यायालयात वा प्राधिकरणापुढे कोणताही दावा दाखल करता येणार नाही.

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना आवश्यक वाटतील अशा इतर अटी.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०८१७१३३७४९२९४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY NAMDEO JADHAV

Digitally signed by SANJAY NAMDEO JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests DEPARTMENT,
2.5.4.20=5459D36186F52B61CB47B4246001E4C0BBD80C48F89ADEA8F0037E8608934214, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5D495C041EC26693EC8970305B3BF74FD0E430FCD53917C7F440A44AC2DC6A30, cn=SANJAY NAMDEO JADHAV
Date: 2026.08.17 13:39:58 +05'30'

(संजय जाधव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) अपर मुख्य सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे.
६) उप वनसंरक्षक, पुणे.
७) क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लि., एम.आय.डी.सी. कुरकुंभ, ता.दौंड, जि.पुणे.
८) आई सेवाभावी संस्था, दौंड, ता.दौंड, जि.पुणे
९) निवडनस्ती (फ-१० कार्यासन).